# प्रेस नोट

दि.५/०९/२०१९

**सिंधुदुर्ग जिल्हा पोलीस दलाचे आस्थापनेवरील पोलीस कर्मचारी संदीप राठोड यांनी स्वत:चा जीव धोक्यात घालून करुळ घाटरस्त्यात संरक्षक कठडा तोडून दरीत झुकलेला कंटेनर मधील चालकाचे प्राण वाचविलेबाबत.**

---

दि.३१/०८/२०१९ रोजी हिरो कंपनीच्या दुचाकी मोटार सायकल कंटेनर क्रमांक MR-55-M-5949 हा घेऊन उदयवीर सिंह रा.मंटोलीराम,हातरत, उत्तरप्रदेश हे गगनबावड्याहून घाट रस्त्याने वैभववाडीच्या दिशेने येत असताना घाट रस्त्यातील एका धोकादायक वळणावर कंटेनरचा ब्रेक फेल होऊन कंटेनर रस्त्याच्या संरक्षक कठडा उध्वस्त करीत खोल दरीत झुकला. कंटेनरची मागील बाजु कठड्यातील दगडात अडकल्यामुळे केबीन दरीच्या मुखाशी हेलकावे खात होती . त्यामुळे चालक हे कंटेनरच्या केबीनमध्येच अडकुन होते. त्यांची केबीनमधुन बाहेर येण्याची धडपड सुरु होती. पण कंटेनरच्या केबीनखाली खोल दरी असल्याने जीव वाचविण्यासाठी त्यांचे प्रयत्न अपुरे पडत असल्यामुळे आरडाओरडा करुन मदतीची याचना करीत होते.

दरम्यान एका वाहनधारकाने करुळ पोलीस दुरक्षेत्रात या अपघाताची माहीती दिल्यावर सिंधुदुर्ग जिल्हा पोलीस दलाचे आस्थापनेवरील पोलीस कॉन्स्टेबल संदीप सुरेश राठोड यांनी घटनेचे गांभीर्य ओळखुन तात्काळ घटनास्थळावर पोहोचले. घटनास्थळावरील कंटेनरच्या केबीनमध्ये अडकुन पडलेल्या कंटेनर चालकाला धीर देवुन घाटातुन जाणा-या वाहनचालकांचे मदतीने दोरीला बांधुन शीडी तयार केली. त्या शिडीच्या साहय्याने शर्थीचे प्रयत्न करुन स्वत:चा जीव धोक्यात घालून सदर चालक यांना केबीन मधून सुरक्षीतरीत्या बाहेर काढुन त्यांचे प्राण वाचवून मोलाची कामगिरी केली आहे. त्यांचे या चांगल्या कामगिरीमुळे सिंधुदुर्ग जिल्हा पोलीस दलाची जनमानसातील प्रतीमा उंचावलेली आहे.

मा.जिल्हा पोलीस अधीक्षक सिंधुदुर्ग श्री.दिक्षीत गेडाम यांनी श्री.संदीप राठोड यांचे धाडसी कामगिरीबाबत त्यांचा सत्कार करुन त्यांना १०,०००/- रुपये रोख बक्षीस व प्रशस्तीपत्रक दिलेले आहे. श्री. संदीप राठोड यांच्या या कामगिरीबद्दल त्यांचे सर्व स्तरावरुन कौतुक होत आहे.